**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५८/२०२३ मधील निशाणी ४० वरील आदेश</u>**
**<u>(प्रकाश पाटील वि. मंगल पाटील वगैरे)</u>**
**<u>(CNR NO.MHSNO20030872022)</u>**

प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी, त्यांच्या विरुध्द 'कैफियत नाही' असा जो आदेश झालेला आहे, तो आदेश रद्द करुन मागण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी मुळ दावा ठरावाकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ या वयोवृध्द असुन त्यांना उतारवयामुळे धावपळ होत नाही. तसेच, प्रतिवादी क्रमांक २ हे शिक्षक असुन त्यांना नोकरीच्या कामातील व्यापामुळे विहीत मुदतीत वकीलांची भेट घेवुन कैफियत सादर करता आलेली नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द 'कैफियत नाही' असा आदेश झालेला आहे. तो आदेश रद्द करुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेकरीता प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. सदर अर्जास अनुषंगिक वादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे विस्त्रुत म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

०४. उभय पक्षकारांच्या परस्पर विरोधी कथनांना अनुसरुन पुढील विवाद मुद्दा माझ्या समोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्याविरुध्द 'कैफियत नाही' असा झालेला आदेश, रद्द करुन होणेस पात्र ठरतो का ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

०५. सदर अर्जास अनुसरुन दाव्याचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा ठरावाकरीता व कायम ताकीदीकरीता असल्यामुळे, खरी वस्तुस्थीती समोर येण्याच्या दृष्टीने व सदरचा दावा गुणदोषावर चालण्याच्या दुष्टीने प्रतिवादी यांना देखील त्यांची कैफियत देणेस मुभा देणे आवश्यक आहे.

०६. निर्वीवादपणे प्रतिवादी यांना कैफियत देण्यास ऊशीर झालेला आहे ही वस्तस्थिती आहे. परंतु प्रतिवादी क्रमांक १ यांचे वय विचारात घेता, त्यांना वकीलांना भेटुन कागदपत्रे देता येवु शकलेली नाहीत ही बाब दुर्लक्षीत करता येणारी नाही. निर्विवादपणे, प्रतिवादी यांचा अर्ज उशिराने दिलेला आहे याबाबत शंका उपस्थित करण्याचे कोणतेही कारण नाही. परंतु प्रतिवादी क्रमांक यांचे वय व प्रतिवादी क्रमांक १ यांच्या कामाचे स्वरुप या बाबी विचारात घेता त्यांना वकीलांना भेटण्यासाठी पुरेसा वेळ मिळु शकलेला नाही हे त्यांनी नमुद केलेले कारण पटण्यायोग्य वाटते.

दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता, जर प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेतली नाही तर, प्रतिवादी यांना त्यांचा बचाव घेण्याची संधी नाकारल्या सारखे होईल. तसेच सदर दावा गुणदोषावर निकाली होणार नाही. त्यामुळे भविष्यातील दावे–प्रतिदावे टाळण्याच्या दृष्टीने प्रतिवादी यांची कैफियत रेकॉर्डवर घ्यावी व त्यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करावा असे मला वाटते. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ चे निष्कर्षादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचा नि. ४० कडील 'कैफियत नाही' असा झालेला आदेश रद्द करुन मागणीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.10.26 16:24:21 +0530

सांगली. **(अ. अ. मेहेंदळे)**
दिनांक २६/१०/२०२३ २रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.

प्र मा ण प त्र

मी खात्रीपुर्वक सांगते की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्रीमती आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | – | २६/१०/२०२३. |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | २६/१०/२०२३. |